# स्फोटकांचा शोध

## आल्फ्रेड नोबेल यांची कहाणी

लेखक: रॉय ऍप्स

चित्रे व सजावट: निक माऊंटन

अनुवाद: सुजाता गोडबोले



# स्फोटकांचा शोध

## आल्फ्रेड नोबेल यांची कहाणी



लेखक: रॉय ऍप्स

चित्रे व सजावट: निक माऊंटन

अनुवाद: सुजाता गोडबोले

# प्रकरण १

“तुला तर माशी देखील पकडता येत नाही आणि मला तर तू पकडूच शकणार नाहीस!” मी समुद्रकिनाऱ्यावर पळत होते आणि माझी लहान भावंडे माझ्यामागे पळत होती. माझ्या वडिलांच्या मासेमारी बोटीमागे मी उडी मारली.

“मारिया!” माझी आई बोटीत बसून जाळे दुरुस्त करत होती.





“इथे येऊन बस जरा. मला तुझ्याशी बोलायचं आहे.” आई म्हणाली.

ते काहीतरी महत्त्वाचं असावं असं दिसत होतं.

मी बोटीत चढले आणि तिच्याजवळ बसले.

दरवर्षी हिवाळ्यात सॅन रेमो या आमच्या समुद्र किनाऱ्यावरच्या खेड्यात महालांसारख्या मोठ्या घरांमध्ये श्रीमंत लोक रहायला येत असत.

माझी आई त्यांच्याकडे घरकाम करत असे. माझ्या वडिलांना मासेमारीतून जे काही थोडेफार पैसे मिळत असत त्यात केवळ आईच्या या कामानेच भर पडत असे.

“आता लवकरच हिवाळ्यातले पाहुणे येऊ लागतील,” माझी आई म्हणाली. “आता इथल्या सर्वच बायकांना काहीतरी काम मिळवावे लागेल.”

"सर्व बायकांना म्हणजे?"

आईला मला कोणती महत्त्वाची गोष्ट सांगायची होती ते माझ्या लक्षात आले होते.

"हो, मारिया. तू आता १३ वर्षांची झाली आहेस. म्हणजे आता काम करायला हरकत नाही."

आणि अशा तऱ्हेने काही आठवड्यातच आल्फ्रेड नोबेल या स्वीडनहून आलेल्या एका गृहस्थांच्या घरात मी काम करू लागले.



# प्रकरण २



श्रीयुत नोबेल हे काही फारसे आनंदी गृहस्थ नव्हते, पण ते नेहमी कामात गढलेले असत. बागेच्या एका टोकाला त्यांची एक प्रयोगशाळा होती आणि तिथे अनेक बाटल्या आणि चंबू घेऊन ते काम करत असत.

ते नेमके काय करत असत हे माझ्यासाठी एक गूढच होते. पण माझा धाकटा भाऊ आणि त्याचे मित्र म्हणायचे की ते एक विचित्र जादूगार आहेत.

ते जगातील अत्यंत श्रीमंत लोकांपैकी एक आहेत असे गावातील मोठी माणसे म्हणत असत.

पण मी आनंदात होते. सॅन रेमोमधील माझे काम सर्वात चांगले होते असे मला वाटत होते.



पण एक दिवस हे सर्वच बदलले.

“मारिया, आज सकाळपासून तू फारच खुशीत दिसतेस!” नोबेल साहेब म्हणाले.

“काल आमच्याकडे एक पार्टी होती,” मी उत्तर दिले.

“आम्ही सगळे सहलीसाठी डोंगरावर गेलो होतो. माझ्या धाकट्या भावाचा, एमिलियोचा काल वाढदिवस होता. लहानगा एमिलियो हा माझा सगळ्यात लाडका भाऊ आहे. साहेब, तुम्हाला पण भाऊ-बहिणी आहेत का?”

अचानक नोबेल साहेबांचा चेहरा रागाने लाल दिसू लागल्यावर मात्र मी बोलायची थांबले.

“बस! बस कर आता! माझ्याच घरात असताना माझी चेष्टा करायची तुझी हिंमतच कशी झाली?” ते माझ्यावर ओरडले.

त्यांनी दार जोरात ढकलले. “आताच्या आता निघ! आणि कधीही परत येऊ नकोस!”

मला परत सांगण्याची काहीच गरज नव्हती. मी तीर सुटावा त्याप्रमाणे पुढच्या दरवाजातून बाहेर पडले आणि थेट रस्त्यावरून पळत सुटले.

काय घडले हे जेव्हा मी आईला सांगितले तेव्हा मला मुळीच सहानुभूती मिळाली नाही. “मूर्ख मुलगी! समजत नाही तरी नको तिथे तोंड चालवतेस!” ती मला रागावली.

माझे वडील देखील चांगलेच रागावले. विशेषतः त्यांना जेव्हा समजले की मी नोबेल साहेबांकडून माझ्या कामाचे पैसे न घेताच पळून आले होते तेव्हा तर ते अधिकच चिडले.





“उद्याच सरळ त्यांच्याकडे जा आणि काम केलेल्या दिवसांचे पैसे घेऊन ये, समजले का?”

“हो, बाबा!”

त्या रात्री मला झोपच येईना. नोबेल साहेबांकडे परत जाण्याची मला फार भीती वाटत होती.

मला अचानक कामावरुन काढून टाकण्यासारखे मी काय केले होते ते मला समजत नव्हते.

मला फक्त इतकेच कळले होते की नोबेल साहेब फार अस्वस्थ होते.

# प्रकरण ३

दुसऱ्या दिवशी पहाटे गडगडाटासारखा आवाज ऐकून मला जाग आली.

संपूर्ण घर हादरत होते. हा ढगांचा गडगडाट होता की भूकंप?

मी खिडकीकडे पळाले.

पहाटेचे आकाश उजळले होते.

वादळ नव्हते आणि भूकंपही झाला नव्हता.

परंतु समुद्रकिनाऱ्यावरच्या मोठ्या घरातून धुराचा लहानसा लोळ बाहेर पडत होता.



मी पटकन कपडे चढवले आणि पायात काही न घालताच किनाऱ्यावरून नोबेल साहेबांच्या घराकडे पळत निघाले.

अजून जरी दिवस पूर्ण उजाडला नसला तरीही घराबाहेर लोकांची गर्दी जमली होती.

धूर काही घरातून येत नव्हता, तर तो बागेच्या एका कोपऱ्यात असलेल्या नोबेल साहेबांच्या प्रयोगशाळेतून येत होता हे आता स्पष्ट दिसत होते.

नोबेल साहेबांच्या घराची देखभाल करणाऱ्या बाई घराच्या पुढच्या दरवाजातून आपले सामान घेऊन पळत पळत घराबाहेर पडल्या.

आपल्या कपाळाकडे बोट नेऊन त्या किंचाळल्या, "त्यांचे डोके फिरले आहे! वेडा परदेशी! आपल्याला सगळ्यांना ते एक दिवस स्फोटात उडवून देतील! मी आता इथे एक मिनिटभर देखील काम करणार नाही!"



जमलेल्या काही लोकांनी तिला तिचे सामान घेऊन जायला मदत केली.

बाकीचे लोक एकमेकांशी बोलता बोलता हळू हळू पांगू लागले.

"त्यांचे डोके ठिकाणावर नाही, त्यांना मोकळे ठेवता कामा नये." ते म्हणत होते.

पडद्यामागे उभ्या असलेल्या नोबेल साहेबांचा काळजीत असलेला चेहरा मला दिसला.

मी घरी परत आले तेव्हा आई कठोर आवाजात म्हणाली, "तू परत कधीही त्या माणसाच्या घरी जायचं नाहीस, तुझा राहिलेला पगार घ्यायला सुद्धा नाही, समजलं ना?"

मी समुद्रकिनाऱ्यावर जाऊन वाळूत रेघोट्या काढत बसले आणि माझा लहान भाऊ एमिलियो लाकडाचा एक तुकडा घेऊन पाण्यात खेळत होता.



“मारिया?” माझ्यामागून एक ओळखीचा पण परदेशी आवाज ऐकू आला.

मी चटकन वळून पहिले.

“नोबेल साहेब!”

“तुझा राहिलेला पगार.” त्यांनी एक पाकीट माझ्यासमोर धरले.

मी ते घेतले आणि त्यांना तोंडातल्या तोंडात धन्यवाद दिले. खरे तर हे विचित्र होते, पण आता ते मुळीच भीतीदायक दिसत नव्हते. उलट ते जरा दु:खी दिसत होते.

“तुमच्या प्रयोगशाळेतील अपघातात बरेच नुकसान झाले का?” मी विचारले.

माझा प्रश्न लक्षात यायला त्यांना थोडा वेळ लागला, कारण ते एमिलियोकडे लक्ष देऊन पाहत होते.

“आं… ? नाही. नाही. विशेष काही नाही.” मग जरा थांबून ते म्हणाले, “मारिया, तू माझ्याकडे कामाला परत येशील का?”

त्यांनी स्वतः मला विचारले! आदल्या दिवशी ते माझ्यावर चिडले होते त्याची पुसटशी खूणही आता नव्हती.



“पण माझे आई-वडील मला येऊ देणार नाहीत,” मी उत्तर दिले.

“मी जर तुला दुप्पट पगार दिला तरीही?”

मी एक आवंढा गिळला.

“बाबा म्हणतात की तुम्ही एक विचित्र, वेडे गृहस्थ आहात!” माझ्या मागून एक लहानसा आवाज आला. “ते म्हणतात की तुम्हाला डांबून ठेवायला हवे!”

मी नोबेल साहेबांशी बोलत असताना एमिलियो आमच्याजवळ आला होता हे माझ्या लक्षातच आले नव्हते.

“एमिलियो!” मी त्याचे कान पकडायला गेले पण त्याने मला चुकवले. मी त्याचा शर्ट पकडला आणि त्याला ओढत घरी नेण्याचा प्रयत्न करू लागले.

“हा एमिलियो का?” नोबेल साहेबांनी विचारले.

मी मान डोलावली. आदल्या दिवशी एमिलियो बद्दल बोलल्यामुळेच मला नोबेल साहेबांच्या रागाला तोंड द्यावे लागले होते हे मी विसरले नव्हते.

त्यांनी एक उसासा सोडला, “त्याला नीट सांभाळ,” ते म्हणाले.



# प्रकरण ४

“काय? तुला दुप्पट पगार देणार?” माझ्या वडिलांचा चेहरा रागाने लाल झाला होता. “जगातली सर्व संपत्ती जरी त्यांनी तुला देतो म्हटले, तरीही मी तुला तिथे कामाला जाऊ देणार नाही. त्यांच्याकडची घर सांभाळणारी बाई देखील निघून गेली आहे.”

माझ्या आईने वडिलांकडे डोळे रोखून पहिले.

“तिने नक्कीच कामाला परत जायला हवे. एवढे पैसे मिळणार असतील तर ते तसेच कसे सोडून देणार?”

“त्या वेड्या परदेशी माणसाकडे तू आपल्या मुलीला कामाला पाठवणार आहेस का?”

मी आळीपाळीने दोघांकडे पाहत राहिले. जणू काही मी तिथे नसल्यासारखे ते माझ्याबद्दल बोलत होते!

“आपला खर्च भागवण्यासाठी तुमच्याकडे दुसरा काही मार्ग आहे का?”

माझे वडील तिथून रागात निघून गेले.

त्यानंतर माझी आई माझ्याकडे वळली.

“जे कोणी दुप्पट पैसे द्यायला तयार असतील, ते काही फार वाईट असणार नाहीत,” ती म्हणाली तेव्हा तिच्या डोळ्यात एक चमक होती.



"त्यांच्या प्रयोगशाळेत ते काय करतात माहित आहे का? स्फोट होईल अशा वस्तू घेऊन ते प्रयोग करतात." मी माहिती पुरवली.

"तर मग त्यांच्या प्रयोगशाळेत जाऊ नकोस." माझ्या आईने रुक्षपणे उत्तर दिले.



दुसऱ्या दिवशी मी नोबेल साहेबांच्या घरी कामाला निघाले तेव्हा माझ्या छातीत जोरात धडधडत होते. मला नोबेल साहेबांकडच्या स्फोटांची भीती वाटत नव्हती, पण भीती वाटत होती ती त्यांच्या रागाची.

नोबेल साहेबांमध्ये काहीतरी गूढ दडलेले होते म्हणून त्यांच्याकडे कामाला जाण्यात मला कुतूहल आणि उत्कंठाही होती.

नेमके काय आहे ते मला जाणून घ्यायचे होते.

# प्रकरण ५

पहिल्या दिवशी कामाला गेल्यावर साफ-सफाई, धूळ पुसणे, पॉलिश करणे अशी कामाची खूप गडबड होती. या 'वेड्या शास्त्रज्ञाच्या' जवळपासही न जाण्याची मी काळजी घेत होते.

अनेक दिवस आणि आठवडेही असेच चालले होते. हे काम फारच एकाकी होते. नोबेल साहेब एकटेच राहत असत.

घरात इतर कोणी नोकरही नव्हते. त्यांच्याकडे कोणी पाहुणे किंवा साधे भेटायलाही कोणी येत नसे.





रोज सकाळी मी बागेतल्या त्यांच्या प्रयोगशाळेत त्यांना कॉफी नेऊन देत असे.

ओळीत ठेवलेल्या बाटल्या आणि चंबुंकडे मी बाहेरूनच डोकावून पहात असे, पण मी आत मात्र जात नव्हते.

नोबेल साहेबांचे जे काही गूढ रहस्य होते त्याचे उत्तर काही प्रयोगशाळेत सापडणार नाही याची मला खात्री होती.

नोबेल साहेब बरेच वेळा एमिलियोची चौकशी करत पण त्या दिवसानंतर ते कधीच रागावले नाहीत. वास्तविक, माझ्या भावाकडे त्यांच्या या रहस्याचे उत्तर आहे अशी आता मला खात्री वाटू लागली होती.

आमच्या गावात आता मी एक महत्त्वाची व्यक्ती बनले होते. “ती बघ, मारिया निघाली आहे,” लोक मला पाहून कुजबुजत. “तीच त्या वेड्या नोबेल साहेबांकडे काम करते!”

एक दिवस नोबेल साहेबांच्या कार्यालयात साफ-सफाई करताना माझ्या लक्षात आले की त्यांच्या टेबलाचा वरचा खण उघडा होता.

एका मोठ्या पांढऱ्या रंगाच्या घरासमोर दोन लोक उभे असलेला एक जुना फोटो त्यात होता.

त्यात सूट घातलेला एक तरुण होता, ते नोबेल साहेब होते हे मी सहज ओळखू शकले.

दुसरी व्यक्ती म्हणजे एक माझ्या वयाचा मुलगा होता. त्याचा चेहरा हसरा होता आणि तो खूप देखणा होता.

नीट जवळून पाहण्यासाठी मी तो फोटो हातात घेतला.

अचानक मागचे दार आपटल्याचा आवाज आला. मी चटकन तो फोटो खणात परत ठेवायच्या प्रयत्नात होते, पण त्या गडबडीत फोटो माझ्या हातातून निसटला आणि खाली जमिनीवर पडला.

मी घाईघाईने तो उचलण्यासाठी खाली वाकले पण माझ्यावर एक मोठी सावली पडल्याचे माझ्या लक्षात आले. मी वर पहिले . “मला माफ करा नोबेल साहेब,” मी पुटपुटले. “तो खण उघडा होता...”



काहीही न बोलता त्यांनी तो फोटो माझ्या हातातून घेतला. आता ते माझ्यावर ओरडणार आणि मला घरातून चालते व्हायला सांगणार, याची मी वाट पाहत होते.

पण तसे काहीच झाले नाही.

बराच वेळ ते त्या फोटोकडे टक लावून पहात राहिले. आणि त्यावेळी माझ्या लक्षात आले की त्यांना जरी राग आला असला, तरी तो आता निघून गेला आहे.

दूरवर कुठेतरी पाहत असल्याप्रमाणे दुःखी नजरेने त्यांनी माझ्याकडे पहिले. ते म्हणाले, “मारिया, ये, मी तुला एक गोष्ट सांगतो.”



# प्रकरण ६



“आतापर्यंत माझ्या प्रयोगांचे स्वरूप तुला समजलेच असेल,” नोबेल साहेब म्हणाले.

मी मान डोलावली.

“स्फोटके बनवणे हा माझ्या वडिलांचा देखील व्यवसाय होता. माझ्या देशात स्वीडनमध्ये, स्टॉकहोम या शहराजवळ मी त्यांच्या आणि माझ्या धाकट्या भावासोबत स्फोटकांचा एक लहान कारखाना सुरु केला होता.

मी परत मान हलवली.

“एक वर्षभर सर्व काही ठीक चालले होते. आम्ही नायट्रोग्लिसरीन विकत असू...”

माझ्या कपाळावर आठ्या दिसल्या असणार.

“... हा एक तेलकट पदार्थ आहे, तो खूप स्फोटक असतो. खाणकामासाठी आणि दगडांच्या खाणीत वापरण्यासाठी आम्ही तो विकत असू. सप्टेंबरमध्ये एक दिवस काहीतरी भयंकर घडले. एक खूप मोठा स्फोट झाला...”

“म्हणजे तुमच्या प्रयोगशाळेत मागल्या आठवड्यात झाला तसा?” मी विचारले.



नोबेल साहेबांनी मान नकारार्थी हलवली. “त्या स्फोटाने संबंध कारखाना आणि आजूबाजूची घरे देखील हादरली.”

ते ऐकून मी घाबरले.

“पाच लोक मारले गेले. त्यातले चार जण कारखान्यातील कामगार होते...”

नोबेल साहेब थांबले. “आणि पाचवा?” मी विचारले.

“माझा धाकटा भाऊ एमिल.”

यानंतर काहीच बोलण्याची गरज नव्हती. फोटोतला मुलगा म्हणजे नोबेल साहेबांचा लहान भाऊ एमिल होता हे मला कळले.

त्यांना आणखी कोणी भाऊ-बहीण आहेत का असे मी विचारल्यावर ते इतके का रागावले होते हे देखील मला आता समजले. आणि माझ्या एमिलियो या लहान भावात त्यांना का स्वारस्य होते हे ही माझ्या लक्षात आले.

आता नोबेल साहेबांचे रहस्य मला कळून चुकले होते.



“एमिल हा माझा सर्वात लाडका भाऊ होता,” नोबेल साहेब शांतपणे म्हणाले. ते अजूनही फोटोकडे पाहत होते.

“मला खरंच वाईट वाटतं,” मी म्हणाले.

नोबेल साहेबांनी फोटो हळूच टेबलावर ठेवला.

“गावात याचे मोठेच पडसाद उमटले. मी रस्त्यावर गेलो की लोक मला धक्काबुक्की करत. कोणी माझ्यावर थुंकत. ‘खुनी!’ मला पाहून ते किंचाळत.

“कारखान्याबाहेर लोक मोर्चे आणत आणि नगरपालिकेने कारखाना बंद करावा अशी मागणी करत. मग तो बंद करण्यात आला. आम्हाला जाण्यासाठी कुठलीच जागा उरली नव्हती. अखेर आम्हाला आमचा कारखाना मलर तळ्यातील एका जुन्या तराफ्यावर सुरु करावा लागला.

“त्या दिवसापासून मी झोकून देऊन काम करू लागलो. कामात असलं की इतर गोष्टी विसरणं सोपं जातं.”



“स्फोटके बनवण्याचेच काम ना?”

नोबेल साहेबांनी मान डोलावली. “पण जास्त सुरक्षित स्फोटके. मी असा शोध लावला की ‘किसेलगूर’ नावाच्या छिद्रे असणाऱ्या मातीच्या लगद्यात जर नायट्रोग्लिसरीन मिसळले, तर ते हाताळणे पुष्कळच सुरक्षित होते. हा शोध जर मी काही वर्षांपूर्वी लावला असता, तर माझा छोटा भाऊ आज जिवंत असता...”

नोबेल साहेबांनी हे बोलणे अर्ध्यावरच सोडले. त्यांनी खांदे उडवले आणि ते दाराकडे निघून गेले.

“मी हे सर्व तुला सांगून का त्रास देतो आहे हे मलाच समजत नाही... एका म्हाताऱ्याच्या मनातले दुःखी विचार!” ते म्हणाले.

मी हळूच स्मित केले, पण काही बोलले नाही.

पण त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले होते: कोणाशी बोलावे असे कोणीच त्यांना नव्हते.



# प्रकरण ७

त्यानंतर नोबेल साहेब आणि मी बरेच वेळा बोलत असू. मी त्यांना गावात घडणाऱ्या गोष्टींविषयी सांगत असे. एक दिवस तर मी त्यांना एन्झो बद्दलही सांगितले. तो रोज काम झाल्यावर मला घरापर्यंत सोडायला माझ्यासोबत येत असे.



नोबेल साहेबांचा आणि त्यांच्या मोठ्या भावांचा तेल वाहतुकीचा मोठा व्यवसाय होता, त्याबद्दल ते मला सांगत. एका वेळी त्यांच्याकडे स्वतःच्या मालकीची ५३ तेलवाहू जहाजे होती आणि त्यातील काही तर ५ हजार टनाची होती! मी हे घरी सांगितलं तेव्हा बाबांना देखील ते विशेष वाटलं.

नोबेल साहेब परत परत डायनामाइट या विषयाकडे येत असत.

एक दिवस ते म्हणाले, “कधी कधी मला वाटतं की मी अशी भयंकर गोष्ट शोधून काढायलाच नको होती.”

“पण साहेब, डायनामाईट तर किती उपयोगी आहे! त्याच्यामुळेच अभियंत्यांना आल्प्स पर्वतातून आगगाडीचा रस्ता तयार करता आला, नाही का! डायनामाईट नसते तर हे शक्य झालेच नसते.”

नोबेल साहेबांनी संथपणे मान डोलावली.

“ते खरे आहे. पण युद्धात याचा शस्त्र म्हणून झालेला वापर भयंकर आहे.”

“आता काही तो शोध नाहीसा तर करता येणार नाही.”

“मी या जगातून निघून गेल्यावर देखील ‘याने बॉम्ब तयार केले’ अशीच माझी ओळख राहील. आता देखील मला असेच म्हणतात.”

“पण जगातील सर्वात श्रीमंत माणूस म्हणून देखील लोक तुम्हाला ओळखतात.” मी सहजच उत्तर दिले. क्षणभर मला वाटले की माझ्या आगाऊपणाबद्दल ते माझी कानउघाडणी करतील.



पण त्यांनी नुसतीच मान डोलावली.

मग मीच पुढे म्हणाले, “म्हणजे, मला म्हणायचं होतं की तुम्ही भविष्यकाळासाठी इतरही काही मागे ठेवू शकाल...”

यावर एक शब्दही न बोलता नोबेल साहेब खोलीतून निघून आपल्या अभ्यासिकेत गेले.



आणि मी माझे रोजचे काम करू लागले.

यानंतर मात्र नोबेल साहेब कधीच डायनामाईट बद्दल माझ्याशी बोलले नाहीत.

# प्रकरण ८

त्यानंतर आणखी दोन हिवाळ्यामध्ये मी नोबेल साहेबांच्या घरी काम केले. मग माझा एन्झोशी विवाह झाला आणि आम्ही सॅन रेमो सोडून किनाऱ्यावरच्याच पण आणखी दक्षिणेकडच्या एका गावात राहू लागलो.



काही वर्षांनंतर मी एका वृत्तपत्रातील मथळा पाहिला: “श्रीयुत नोबेल यांचे सॅन रेमो मध्ये निधन”. हा दिवस माझ्या चांगलाच लक्षात आहे, कारण त्याच दिवशी माझ्या दुसऱ्या मुलाचा जन्म झाला.

कालांतराने मला जेव्हा विज्ञान व औषधे, साहित्य आणि शांततेसाठी ठेवलेल्या नोबेल पुरस्कारांविषयी समजले, तेव्हा मी नोबेल साहेबांना म्हटलेले माझेच शब्द मला आठवले:

“भविष्यकाळासाठी तुम्ही इतरही काही मागे ठेवू शकाल”.





समुद्र किनाऱ्यावर माझी दोन्ही मुले पळत, खेळत होती आणि मी त्यांच्याकडे पाहत बसले होते.

माझ्या मोठ्या मुलाचे नाव आम्ही एमिलियो ठेवले होते म्हणून मी खूष होते, पण धाकट्याचे नाव आम्ही अल्फ्रेडो ठेवले होते त्याचा मला अधिक आनंद होता.

# कालक्रम

आल्फ्रेड नोबेल यांचा जन्म स्वीडन मधील स्टॉकहोम येथे २१ ऑक्टोबर १८३३ रोजी झाला.

१८४२ नोबेल कुटुंब रशियातील सेंट पिटर्सबर्ग येथे राहू लागले.

१८५० नोबेलनी रशिया सोडला. त्यांना ५ भाषा उत्तम रीतीने बोलता येत होत्या. त्यांनी चार वर्षे अमेरिकेत काम केले.

१८६३ नोबेल व त्यांच्या वडिलांनी नायट्रोग्लिसरीनचा पहिला कारखाना सुरु केला.

१८६४ नोबेल यांच्या कारखान्यातील एका स्फोटात आल्फ्रेड यांचा धाकटा भाऊ एमिल याचा मृत्यू. नायट्रोग्लिसरीन हाताळणे अधिक सुरक्षित करण्यासाठी आल्फ्रेड यांचे संशोधन सुरु.

१८६७ नोबेल यांना डायनामाईट साठी इंग्लंडमध्ये पेटंट मिळाले. म्हणजे त्यांची कल्पना इतर कोणालाही वापरता येणार नाही.



१८७६ 'ब्लास्टिंग जिलेटीन' या अधिक शक्तिशाली डायनामाईटचे नोबेल यांना पेटंट.

१८९१ फ्रान्स मधून नोबेल यांचे इटलीत स्थलांतर. काही काळ सॅन रेमो येथे वास्तव्य.

१९०१ नोबेल यांच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, आरोग्य व औषधे, साहित्य आणि शांतता यासाठीची पहिली नोबेल पारितोषिके देण्यात आली

आल्फ्रेड नोबेल यांचे १० डिसेंबर १८९६ रोजी इटलीतील सॅन रेमो येथे वयाच्या ६३ व्या वर्षी निधन झाले.

समाप्त